महाराष्ट्र शासन
मृद व जलसंधारण विभाग
आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.)
वाल्मी परीसर, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर-४३१००२

---

## जाहीर सूचना

मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तर व जिल्हा परिषद यंत्रणेतील जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या संवर्गातील ६७० रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी, आयुक्त, मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत दि. १९/१२/२०२३ रोजी सदर पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर परीक्षा टी.सी. एस. कंपनीमार्फत, ऑनलाईन पद्धतीने, **दि. २० व २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी २८ जिल्ह्यामध्ये एकूण ६६ केंद्रांवर घेण्यात येणार आहे.**

सदरहू परीक्षा पारदर्शी व व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी पुरेशी दक्षता घेण्यात आली असून यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. सर्व परीक्षा केंद्रांवर :

१. सी.सी.टि.व्ही.यंत्रणा,

२.जॅमर यंत्रणा कार्यान्वित आहेत.

सदरहू केंद्रांवर उमेदवारांची पूर्वतपासणी करुनच परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्यात येणार आहे. उमेदवारांस कोणत्याही स्वरुपाचे ;

- इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स,
- ब्लुटुथ उपकरणे इत्यादी वापरण्यास व बाळगण्यास बंदी असणार आहे.
- No Internet Access in candidate system

- Sealed and encrypted (256 bit) question paper transferred to data centre using secured VPN.
- संपूर्ण परीक्षा पारदर्शी पध्दतीने पार पाडण्याबाबत मुद्देनिहाय दक्षता संदर्भात "Precautions taken for transperancy in an Examination" या मथळ्याखाली विभागाच्या swcd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर सूचना प्रसारित केल्या आहेत. या संदर्भात TCS कंपनीचे प्रतिनिधी व संबंधीत शासकीय अधिकाऱ्यांची मंत्रालयात दि.१८/०२/२०२४ रोजी बैठक घेतली आहे.

तसेच, सदरहू परीक्षा केंद्राबाहेर आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सर्व परीक्षा केंद्रांवर विभागाकडून निरीक्षक नेमण्यात आलेले आहेत.

तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एम.पी.एस.सी.) अभियांत्रिकी सेवा परीक्षा, २०२२ च्या मुलाखती दिनांक २०/०२/२०२४ ते दि.२७/०२/२०२४ या कालावधीत आयोजित केल्या आहेत. सदरहू अभियांत्रिकी सेवा परीक्षा, २०२२ च्या मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या व दि.२० व २१ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या परीक्षेस बसलेल्या उमेदवारांच्या मुलाखती पुढे ढकलण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास विनंती करण्यात आली असून, आयोगाकडून मुलाखतीसाठी सुधारित दिनांक देण्यात येणार आहे.

सर्व संबंधित परीक्षार्थीनी याची नोंद घ्यावी.

(सुनील चव्हाण भाप्रसे) 18/2/2024
आयुक्त तथा अध्यक्ष
राज्यस्तरीय निवड समिती
मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर

दिनांक : १८/०२/२०२४